# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,
छत्रपती संभाजीनगर.
**( उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग )**

जा.क्र.मनपा/वृ.प्रा./२०२६/ 323 दिनांकः- 13.07.2026

## जाहिर लिलाव फेरसुचना

शहरातील सर्व संबंधित व्यापारी/फळ विक्रेत्यांना या सुचनेद्वारे कळविण्यात येते कि, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाच्या आखत्यारितील सिध्दार्थ उद्यान येथील नारळ फळे उतरवुन, आहे त्या स्थितीत जाहिर लिलाव पध्दतीने विक्री करावयाचे आहे. दरपत्रकांच्या आधारे सक्षम मान्यतेने निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार प्रत्यक्ष जागेवर जाहिर लिलाव आयोजित करण्यात आला आहे. लिलावाचा तपशिल खालील प्रमाणे.

- लिलावाचे ठिकाणः- सिध्दार्थ उद्यान, मध्यवर्ती बसस्थानक जवळ
- लिलावाची तारीखः- १५/०७/२०२६
- लिलावाची वेळः- दुपारी ०२:०० वाजता
  किमान अधारभुत किंमतः- रक्कम रुपये १२/- प्रति नग नारळ फळ.
- बयाना रक्कमः-२,०००/- (लिलावापुर्वी जमा करणे अनिवार्य.)

## लिलावाच्या मुख्य अटी व शर्ती

१. लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या प्रत्येक बोलीधारकाला लिलाव सुरू होण्यापूर्वी बयाना रक्कम रुपये २,०००/-चा डी.डी.(उप आयुक्त, मनपा छत्रपती संभाजीनगर यांचे नावे) स्वरुपात जमा करावा लागेल. डी.डी.जमा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
२. यशस्वी बोलीधारका व्यतिरिक्त इतर सर्व उमेदवारांची बयाणा रक्कम लिलाव प्रक्रिया संपताच तात्काळ परत करण्यात येईल.
३. लिलावाची सुरुवात निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमतीपासून म्हणजेच रक्कम रुपये १२/- पासुन पुढे वाढवुन बोलावी लागेल.
४. लिलावाच्या बोलीची पट ही किमान आधारभुत रक्कमेच्या र.रु.१/- च्या पटीत रहावी.
५. सर्वोच्च बोली बोलणा-या व्यक्तीचा लिलाव तात्पुरता मंजूर केला जाईल. मात्र, अंतिम मंजुरी वरिष्ठांच्या मान्यतेने दिली जाईल.
६. कार्यादेशपुर्वी बोलीधारकास रक्कम रुपये २५,०००/- इतकी रक्कम मनपा फंडात आगाऊ भरणा करावी लागेल.
७. बोलीधारकास स्वखर्चाने नारळ फळे उतरवुन जागेवरुन उचलणे बंधनकारक असेल. मुदतीत नारळ फळे उतरवुन न नेल्यास किंवा अर्धवट झाडे/फळे सोडल्यास बयाना रक्कम जप्त केली जाईल.
८. नारळ फळे उतरवताना कोणत्याही प्रकारचा अपघात होवुन जिवीत वा वित्त हानी अथवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई करुन देणेची जबाबदारी बोलीधारक यांच्यावर राहिल.
९. वृक्षाची फळे उतरविण्याची कार्यवाही ही कृषी सहाय्यक/मुख्य माळी यांचे उपस्थितीत करावी लागेल.
१०. उतरविलेल्या फळांची प्रति नग प्रमाणे येणा-या रक्कमेचा त्याच दिवशी भरणा करावा लागेल. भरणा न केल्यास माल/फळे आपणास ताब्यात देण्यात येणार नाहीत.
११. कोणतेही कारण न देता लिलाव रद्द करण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा अधिकार मनपाने स्वतःकडे राखून ठेवला आहे.

Digitally signed by
Vijay Bapusaheb Patil
Date: 12-07-2026
14:45:57

(विजय पाटील)
**मुख्य उद्यान अधिकारी**
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर.

प्रत :-
१) सिस्टिम मॅनेजर, संगणक विभाग, मनपा यांना देऊन कळविण्यात येते की, मनपाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावे.

Scanned with OKEN Scanner